**राज्यातील दूध उत्पादकांना शासनामार्फत करण्यात येणाऱ्या दूध खरेदी दर, शासकीय दुधाच्या विक्री दरात वाढ व सहकारी दूध संघ / संस्था यांच्या वरकड खर्चात वाढ करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमएलके २०१३ /प्र.क्र. ४५ / पदुम ८
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०००३२
दिनांक :२२ मे, २०१३

वाचा : १. शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र.१९१/पदुम ८, दि.२५.८.२०११
२. शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक एमएलके २०११/ प्र.क्र.१९१/पदुम ८, दि. १७.११.२०१२

**प्रस्तावना :**

राज्यातील दूध संकलन शासन, सहकार व खाजगी क्षेत्रामार्फत होत असल्याने दूध खरेदी दरात बाजारातील चढ- उतार लक्षात घेवून काही दूध संघ व बहुतेक खाजगी प्रकल्प दूध खरेदी दरात बदल करुन त्यांच्याकडील दूध संकलन नियंत्रित करीत असतात. परिणामी शासनाकडे होणाऱ्या दूध पुरवठयावर परिणाम होवून शासनाकडील दूध वितरण व उत्पादन यामध्ये नियोजन राखणे शक्य होत नाही. त्यासाठी ज्या प्रमाणात खुल्या बाजारात दूध खरेदीचे दर असतील त्याच्या आसपास शासनाचे दूध खरेदी दर असणे आवश्यक आहे. यास्तव राज्यातील दूध संकलनाची व दूध खरेदी दराची स्थिती पाहता शासनाकडे होणाऱ्या दूध संकलनात सातत्य व नियमितपणा रहावा यासाठी दूध खरेदी व विक्री दर व संघ / संस्था यांच्या कमिशन निर्धारित करुन निर्णय घेण्यासाठी मा.मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानुसार दि.१३.८.२००९ च्या शासन निर्णयान्वये मा.सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली प्रदत्त समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. राज्यातील सद्य:स्थितीतील दर खरेदी दर, उत्पादन खर्च इ. बाबींचा आढावा घेऊन नवीन दर निश्चित करण्याबाबत प्रदत्त समितीच्या दिनांक १५.५.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने दूध खरेदी, विक्री दर व वरकड खर्चात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

शासनामार्फत खरेदी करण्यात येणाऱ्या गाय / म्हैस दुधाचे दर पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत.

१) राज्यातील दूध उत्पादकांकडून ३.५ फॅट व ८.५ एसएनएफ गुणप्रतीच्या गाय दूध खरेदी दरात प्रति लिटर रु.१.५० ने वाढ करण्यात येत असून त्यामुळे दूध खरेदी दर रु.१७/- वरुन रु.१८.५०/- एवढा करण्यात येत आहे. तसेच ३.६ ते ५.० प्रति पॉईट वाढीव फॅट साठी २० पैसे इतकी वाढ कायम ठेवण्यात येत आहे.

D:\Year 2013\Milk rate\GR 5-2013.docx

२) राज्यातील दूध उत्पादकाकडून ६.० फॅट व ९.० एसएनएफ गुणप्रतीच्या म्हैस दूध खरेदी दरात प्रति लिटर रु.२.५० ने वाढ करण्यात येत असून ते रु.२५/- वरुन रु.२७.५०/- एवढा करण्यात येत आहे. तसेच ६.१ ते ७.५ प्रति पॉईंट वाढीव फॅट साठी ३० पैसे वाढ कायम ठेवण्यात येत आहे.

३) राज्यातील संघ/सहकारी संस्था /बहुराज्यीय संघ/नोंदणीकृत प्रकल्प यांना देण्यात येणाऱ्या वरकड खर्चामध्ये प्रति लि.५० पैसे इतकी वाढ करण्यात येत असून रु.२.५० ऐवजी रु. ३.०० इतके करण्यात येत आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | तपशिल | सध्याचे दर | सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १. | अंतर्गत वाहतुक | १२० पैसे | १३० पैसे |
| २. | शितकरण आकार | ३५ पैसे | ३५ पैसे |
| ३. | व्यवस्थापन खर्च | ३० पैसे | ४५ पैसे |
| ४. | कॅन खर्च | ०५ पैसे | ०५ पैसे |
| ५. | संस्था कमिशन | ६० पैसे | ८५ पैसे |
| | एकुण | २५० पैसे | ३०० पैसे |

४) शासकीय दूध योजनेमार्फत बृहन्मुंबई दूध योजना व ग्रामीण योजनांमार्फत विक्री करण्यात येणाऱ्या पिशवीबंद गाय / टोण्ड दूध विक्री दरात प्रति लिटर रु.२.०० ने वाढ करण्यात येत असून म्हैस / फूल क्रिम दूध विक्री दरात प्रति लिटर रु.३.०० इतकी वाढ करण्यात येत आहे. सुधारीत दराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे —

| अ. क्र | नाव | दूधाचा प्रकार | गुणप्रत | सध्याचे विक्रीदर रु. | | सुधारीत विक्री दर रु | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ लि. | १/२ लि. | १ लि. | १/२ लि. |
| १ | बृ.मु.दू.यो. | गाय/टोण्ड दूध | ३.५/८.५ | २९.०० | १४.५० | ३१.०० | १५.५० |
| | | फूल क्रिम/म्हैस | ६.०/९.० | ३७.०० | १८.५० | ४०.०० | २०.०० |
| २ | ग्रामीण योजना | गाय/टोण्ड दूध | ३.५/८.५ | २८.०० | १४.०० | ३०.०० | १५.०० |
| | | फूल क्रिम/म्हैस | ६.०/९.० | ३६.०० | १८.०० | ३९.०० | १९.५० |

**हे आदेश दि.२५.५.२०१३ पासून अंमलात येतील.**

हे आदेश प्रदत्त समितीच्या बैठकीत गाय / म्हैस दूध खरेदी दरात व विक्री दरात तसेच संघ / संस्था वरकड खर्चात वाढ करण्याबाबत शिफारस केल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श.मा.साठे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे